महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण

जनसंपर्क विभाग

कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.

दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com


================================================================================

जावक क्रमांक – ७३५/३७ दिनांक :- २८ मार्च , २०२५

प्रसिद्धिपत्रक

# ‘म्हाडा’छत्रपती संभाजीनगर मंडळाच्या पहिल्या जनता दरबार दिनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

म्हाडा उपाध्यक्ष संजीव जयस्वाल यांच्या मार्गदर्शनाखाली १०० दिवसांच्या कृती आराखड्याची तात्काळ अंमलबजावणी

मुंबई, दि. २८ मार्च, २०२५ :- नागरिकांच्या तक्रारींचे तातडीने आणि न्याय्य समाधान व्हावे यासाठी 'म्हाडा'च्या छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने आज प्रथमच जनता दरबाराचे आयोजन केले. म्हाडाच्या मुख्यालयात नियमितपणे होणाऱ्या लोकशाही दिनाच्या धर्तीवर आयोजित जनता दरबार या उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळाला असून तबल ६० अर्जदारांच्या तक्रारींचे निराकरण मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. किशोरकुमार काटवटे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले.

सुमारे चार तास सुरू असलेल्या जनता दरबार सुनावणीमध्ये नागरिकांनी प्रामुख्याने भाडेपट्टा करार नूतनीकरणावर आकारण्यात आलेल्या दंडाची रक्कम क्षमापित करण्याबाबत विनंती अर्ज सादर केले. श्री. काटवटे यांनी सर्व अर्जदारांचे म्हणणे लक्षपूर्वक ऐकून घेत संबंधित विभागीय अधिकाऱ्यांना अर्जदारांच्या तक्रारीवर तात्काळ उचित कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

नागरिकांचे दैनंदिन जीवन सुखकर करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या प्रशासनिक विभागांकरिता मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या निर्देशानुसार व राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी केलेल्या सूचनेनुसार १०० दिवसांचा कृती आराखडा निश्चित करण्यात आला आहे. म्हाडाच्या सर्व विभागीय मंडळांनी १०० दिवसांच्या सात कलमी कृती आराखड्यातील "नागरिकांच्या तक्रारींचे निवारण" या महत्त्वपूर्ण घटकाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जनता दिन आयोजित करावा, असे निर्देश ‘म्हाडा’चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी दिले होते. या निर्देशानुसार व त्यांच्या मार्गदर्शनाखाली म्हाडाच्या छत्रपती संभाजीनगर मंडळ स्तरावर पहिला जनता दरबार दिन घेण्यात आला. जनता दरबार दिन आयोजित करणारे छत्रपती संभाजीनगर मंडळ हे 'म्हाडा'चे दुसरे विभागीय मंडळ आहे.

मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यातील गाळेधारक, भूखंडधारक, सदनिकाधारक यांना पुढील जनता दरबार दिनामध्ये गाळे, भूखंड, सदनिकांबाबत समस्या व अडी-अडचणीबाबत म्हणणे मांडण्यासाठी आपले लेखी निवेदन, अर्ज मंडळाकडे सादर करावेत, असे जाहीर आवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे.

###

(वैशाली गडपाले)

मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण

--------------------------------------------------------------------------------

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East,
Mumbai-400051. Phone No:- 022 66405066/77 Email : cpromhadaoffice@gmail.com

==================================================================

Outward No. : 735/37 Dt. March 28, 2025

Press Release

# Enthusiastic Response to the First Public Hearing Day of MHADA's Chhatrapati Sambhajinagar Board

## Immediate Implementation of the 100-Day Action Plan Under the Guidance of MHADA Vice President Sanjeev Jaiswal

Mumbai, March 28, 2025: In an effort to ensure the prompt and fair resolution of citizen grievances, the Chhatrapati Sambhajinagar Housing and Area Development Board of 'MHADA' organized its first-ever Janata Darbar (Public Hearing Day) today. Modeled after the Lokshahi Din (Democracy Day), which is regularly held at MHADA's headquarters, this initiative received an overwhelming response. A total of 60 applicants' grievances were addressed under the chairmanship of the Board's Chief Officer, Mr. Kishor Kumar Katwate.

During the four-hour-long Janata Darbar hearing, most citizens submitted applications requesting the waiver of penalties imposed on lease renewal agreements. Mr. Katwate carefully heard all applicants and directed the concerned departmental officers to take appropriate action in the course of law on their grievances.

To enhance the quality of daily life for citizens, the Maharashtra Government has implemented a 100-day action plan following directives from Chief Minister Mr. Devendra Fadnavis and instructions from Deputy Chief Minister and Housing Minister Mr. Eknath Shinde. As part of this, MHADA's Vice President and Chief Executive Officer, Mr. Sanjeev Jaiswal, instructed all regional boards of to organize Janata Din (Public Hearing Days) for the effective implementation of the "Grievance Redressal" component of the seven-point action plan. Acting on this directive and under his guidance, the Chhatrapati Sambhajinagar Board successfully conducted its first Janata Darbar day. Notably, Chhatrapati Sambhajinagar is the second regional board of MHADA to organize such an initiative.

On this occasion, the board has appealed the commercial tenents, plot holders, and flat owners from all districts of the Marathwada region to submit written applications regarding their issues and concerns related to shops, plots, and apartments.

###

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer, MHADA

---






D:\Documents\Press Release\37-2025 Chatrapati Sambhaji Nagar First Janata Darbar Din.docx


म्हाडा
MHADA
छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
छ.संभाजीनगर